सन २०१९-२० या आर्थिक वर्षाकरीता वनीकरणाचा भरगच्च कार्यक्रम (४४०६ ०४९२) लेखाशीर्षांतर्गत अनुदान वितरण करण्याबाबत.

महाराष्ट्र शासन
महसूल व वन विभाग
शासन निर्णय क्रमांकः सावनि-२०१९/प्र.क्र.४७ /फ-११
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२
दिनांक : २० ऑगस्ट, २०१९

<u>वाचा</u> :-

१) वित्त विभाग, शासन परिपत्रक क्र. अर्थसं-२०१९/प्र.क.४४/अर्थ-३, दि.०१.०४.२०१९
२) प्रधान मुख्य वनसंरक्षक, (अर्थसंकल्प, नियोजन व विकास) म.रा. नागपूर, यांचे पत्र क्र. कक्ष-१/पी/ यो/चाबा/ प्र.क्र.१२/१३३/१४१/२०१९-२०, दि. ०९.०५.२०१८.
३) महसूल व वन विभाग शासन निर्णय क्रमांक सावनि-२०१९/ प्र.क्र.४७/ फ-११, दि. १७.०५.२०१९
४) वित्त विभाग, शासन परिपत्रक क्र. अर्थसं-२०१९/प्र.क.९२/अर्थ-३, दि.०८.०७.२०१९

<u>प्रस्तावना</u> :-

वन आणि वनेतर क्षेत्रात वृक्ष लागवड व संवर्धन करण्याकरीता राज्य योजनेंतर्गत सन २०१९-२० करीता **"सामुहिक पातळीवर ठोस वनरोपण कार्यक्रम (४४०६ ०४९२) "** या योजनेंतर्गत रु.९४८७५.०० लक्ष इतका निधी (**०२-मजूरी** रु. ७५९००.०० लक्ष + **२१ पुरवठा व सामुग्री**- रु.१८९७५.०० लक्ष) अर्थसंकल्पीत करण्यात आला असून तो खाली नमूद तीन योजनांसाठी विभागून देण्यात आला आहे.

(रुपये लक्षमध्ये)

अ.क्र.	सामुहिक पातळीवर ठोस वनरोपण (४४०६०४९२)	एकूण अर्थसंकल्पिय तरतूद	१ एप्रिल ते ३१ डिसें. २०१९ पर्यंत वितरित करावयाची रक्कम	वितरित करण्यात आलेली रक्कम	पुरवणी मागणीद्वारे अर्थसंकल्पित रक्कम
१	वनीकरणाचा भरगच्च कार्यक्रम	४३५००.००	२६१००.०	११६१७.३७	२००००.००
२	महत्वाच्या रस्त्यांच्या दुतर्फा टेकडयांचे हरितीकरण	३७५.००	२२५.००	११२.५०	--
३	महत्वाचे रस्ते/कालवे/रेल्वे लाईन दुतर्फा वृक्ष लागवड करणे	५१०००.००	३०६००.००	८५००.००	२१६९२.००
	एकूण	९४८७५.००	५६९२५.००	२०२२९.८७	४१६९२.००

तसेच जुलै २०१९ च्या पावसाळी अधिवेशनात वनीकरणाचा भरगच्च कार्यक्रम करिता रु. २००००.०० लक्ष निधीपुरवणी मागणीद्वारे अर्थसंकल्पित करण्यात आलेला आहे.

सन २०१९-२० करीता वनीकरणाचा भरगच्च कार्यक्रमांतर्गत १३ वनवृत्तांतील बांधील कामांच्या चालू बाब प्रस्तावासाठी एकूण रु.३४८५२.११ लक्ष निधीची मागणी प्रधान मुख्य वनसंरक्षक (अर्थसंकल्प, नियोजन व विकास), नागपूर यांचेकडून संदर्भ क्र. २ च्या पत्रान्वये करण्यात आली होती. सदर प्रस्तावाच्या अनुषंगाने दि.३१ जूलै २०१९ पर्यंत ४ महिन्यांकरिता रु. १४५००.०० लक्ष निधी उपलब्ध असल्याने त्यापैकी शासन निर्णय दि. १७ मे २०१९ अन्वये रु. ११६१७.३७ लक्ष निधी वितरित करण्यात आला आहे. आता वित्त विभागाच्या दि. ८ जूलै २०१९ रोजीच्या परिपत्रकान्वये सन २०१९-२० या आर्थिक वर्षात माहे एप्रिल-२०१९ ते डिसेंबर २०१९ पर्यंतच्या ९ महिन्यांच्या कालावधीकरीता अर्थसंकल्पित रकमेच्या ६० % रक्कम रु.२६१००.०० लक्ष इतका निधी वितरणासाठी उपलब्ध आहे. त्यापैकी वरीलप्रमाणे रु. ११६१७.३७ लक्ष वजा जाता रु.१४४८२.६३ लक्ष निधी वितरणासाठी शिल्लक आहे.

प्रधान मुख्य वनसरंक्षक (अर्थसंकल्प, नियोजन व विकास), महाराष्ट्र राज्य, नागपूर यानी संदर्भ क्रमांक २ येथील पत्रान्वये "(००)(०६) सामुहिक पातळीवर ठोस वनरोपण (४४०६ ०४९२) " या लेखाशिर्षाखाली सन २०१९-२० करीता वनीकरणाचा भरगच्च कार्यक्रमांतर्गत १३ वनवृत्तांतील बांधील कामांच्या रु.३४८५२.११ लक्ष चालू बाब प्रस्तावापैकी रु. ११६१७.३७ लक्ष वजा जाता उर्वरित निधीपैकी आणखी ११६१७.३७ लक्ष निधी वितरित करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

<u>शासन निर्णय :-</u>

सन २०१९-२० या वित्तीय वर्षात **(००) (०६) सामुहिक पातळीवर ठोस वनरोपण कार्यक्रम (४४०६ ०४९२)** या योजनेंतर्गत “वनीकरणाचा भरगच्च कार्यक्रम” राबविण्यासाठी प्रस्तावनेत नमूद केल्यानुसार मागणी केलेली रु.३४८५२.११ लक्ष रक्कमेपैकी शासन निर्णय दि.१७.०५.२०१९ च्या शासन निर्णयान्वये वितरित केलेली रक्कम वजा जाता, आता वित्त विभागाच्या संदर्भ क्र.४ अन्वये वितरणासाठी रक्कम उपलब्ध झाल्याने आणखी **रु.११६१७.३७ लक्ष (०२- मजूरी - रु.९२९३.९० व २१ सामुग्री पुरवठा - रु.२३२३.४७ लक्ष) निधी सोबतच्या विवरणपत्रात नमूद केल्याप्रमाणे १३ वन वृत्तांसाठी** वितरित करण्यास शासन मान्यता देण्यात येत आहे.

२. सदर निधीसाठी नियंत्रक अधिकारी म्हणून प्रधान मुख्य वनसंरक्षक (वनबल प्रमुख), महाराष्ट्र राज्य, नागपूर हे राहतील. त्यांच्याकडे हा निधी सुपूर्द करण्यात येत आहे. या योजनेंतर्गत घ्यावयाच्या कामाची अंमलबजावणी कृती आराखड्याप्रमाणे, विहित कार्यपध्दतीनुसार आणि ठरविलेल्या मुदतीत करण्याबाबत दक्षता घ्यावी. याबाबत सविस्तर मार्गदर्शक सूचना क्षेत्रीय अधिकाऱ्यांना द्याव्यात आणि अंमलबजावणीबाबत वेळोवेळी आढावा घ्यावा. मंजूर निधीपेक्षा जास्त खर्च होणार नाही याची नियंत्रक अधिकाऱ्यांनी दक्षता घ्यावी.

३. सदर निधी वितरित करण्यापूर्वी प्रधान मुख्य वनसंरक्षक (अर्थसंकल्प, नियोजन व विकास) यांनी सदर योजनेसाठी, सन २०१८-१९ करिता वितरित केलेला निधी अर्थसंकल्पीय वितरण प्रणाली व्यतिरिक्त अन्यत्र ठिकाणी वळती केला नसल्याची खात्री करावी तसेच वृक्ष लागवडीपैकी जिवंत असलेल्या रोपांच्या टक्केवारीनुसार निधी वितरित/निधीचा वापर करण्यात यावा. या अटीच्या अधीन निधी वितरणाची कार्यवाही करण्यात यावी.

४. सदर निधी खर्च करताना वित्त विभागाच्या संदर्भ क्रमांक १ येथील परिपत्रकातील तरतूदी व महाराष्ट्र अर्थसंकल्पीय नियम पुस्तिका, वित्तीय अधिकार नियम पुस्तिका यामध्ये उल्लेख केलेल्या तरतुदींनुसार व वेळोवेळी दिलेल्या सूचनांचे पालन करण्यात यावे.

५. जिल्हानिहाय वितरीत तरतुदीची माहिती व राबविण्यात आलेल्या कार्यक्रमाची/झालेल्या खर्चाचा तपशील शासनास दरमहा विहित प्रपत्रात सादर करण्यात यावा. तसेच योजनेचे संनियंत्रण प्रधान मुख्य वनसंरक्षक (वनबल प्रमुख), महाराष्ट्र राज्य, नागपूर यांच्यामार्फत व्हावे.

६. सदर योजने अंतर्गत होणारा खर्च खाली नमूद केलेल्या लेखाशीर्षाखाली सन २०१९-२० च्या मंजूर अर्थसंकल्पीत निधीतून खर्ची टाकण्यात यावा.

“मागणी क्र.सी-१०,
४४०६ वनीकरण व वन्यजीवन यावरील भांडवली खर्च,
(००)(०६) सामुहिक पातळीवर ठोस वनरोपन,
वनीकरणाचा भरगच्च कार्यक्रम (४४०६०४९२).
०२- मजूरी व २१ - सामुग्री पुरवठा

७ सदर शासन निर्णय संदर्भ क्रमांक १ येथील वित्त विभागाच्या संदर्भिय दि. ०८.०७.२०१९ च्या परिपत्रकानुसार विभागास प्रदान करण्यात आलेल्या अधिकारास अनुसरुन निर्गमित करण्यात येत आहे.

८. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेतांक २०१९०८२०१२४४२७६२१९ असा आहे. हा शासन निर्णय डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

VIRENDRA RAMBAHAL TIWARI

Digitally signed by VIRENDRA RAMBAHAL TIWARI
DN: c=IN, st=Maharashtra,
2.5.4.20=a95e1a9759002ee190cd79464daaba7dc840ec375cd62a646a64986631086810, postalCode=400032, street=R AND FD,4TH FLOOR,MANTRALAYA,MUMBAI, ou=FOREST DEPARTMENT, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, cn=VIRENDRA RAMBAHAL TIWARI
Date: 2019.08.21 16:18:03 +05'30'

(वीरेंद्र तिवारी)
अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक (मंत्रालय)

सोबत:- विवरणपत्र.

प्रत,

१. प्रधान मुख्य वनसंरक्षक, (वनबल प्रमुख),महाराष्ट्र राज्य, नागपूर.

२. प्रधान मुख्य वनसंरक्षक (अर्थसंकल्प, नियोजन व विकास), महाराष्ट्र राज्य, नागपूर.
३. प्रधान मुख्य वनसंरक्षक, सामाजिक वनीकरण , महाराष्ट्र राज्य, पुणे.
४. मुख्य वनसंरक्षक (प्रादेशिक) (११ वृत्त)
५. वनसरंक्षक , सामाजिक वनीकरण (६ वृत्त)
६. विभागीय वन अधिकारी, सामाजिक वनीकरण (सर्व जिल्हे)
७. महालेखापाल, (लेखापरीक्षा/लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र १ व २ , मुंबई व नागपूर,
८. सर्व जिल्हा कोषागार अधिकारी,
९. अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई ४०० ०३२.
१०. निवासी परिक्षा लेखा अधिकारी,मुंबई
११. वित्त विभाग, व्यय-१०, अर्थसंकल्प-०६ मंत्रालय, मुंबई-३२
१२. कार्यासन अधिकारी, फ-२,महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई-३२
१३. कार्यासन अधिकारी, ब-१,महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई-३२
१४. उप सचिव/अवर सचिव (सर्व), महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई-३२
१५. निवडनस्ती/फ-११.

शासन निर्णय क्रमांकः साववि-२०१९/प्र.क्र. ४७ /फ-११, दि. २० ऑगस्ट, २०१९ चे सहपत्र

"मागणी क्र.सी-१०,

४४०६ वनीकरण व वन्यजीवन यावरील भांडवली खर्च,

(००)(०६) सामुहिक पातळीवर ठोस वनरोपन,

वनीकरणाचा भरगच्च कार्यक्रम (४४०६०४९२).

०२- मजूरी व २१ - सामुग्री पुरवठा

(रुपये लक्षमध्ये)

अ.क्र.	वनवृत्त	मागणी केलेली रक्कम	दि. १७.०५.२०१९ रोजीच्या शासन निर्णयान्वये वितरित करण्यात आलेली रक्कम	याद्वारे वितरित करण्यात आलेली रक्कम
१	पुणे	२६३९.४२	८७९.८१	८७९.८१
२	यवतमाळ	३२५०.५६	१०८३.५२	१०८३.५२
३	धुळे	१४२७.७८	४७५.९३	४७५.९३
४	गडचिरोली	११४१.०१	३८०.३४	३८०.३४
५	चंद्रपूर	२३६७.०८	७८९.०३	७८९.०३
६	औरंगाबाद	१०३६८.१२	३४५६.०४	३४५६.०४
७	कोल्हापूर	२९८८.७४	९९६.२५	९९६.२५
८(अ)	नाशिक (AR)	३१५६.९२	१०५२.३१	१०५२.३१
८(ब)	नाशिक (ANR)	६०.४३	२०.१४	२०.१४
९(अ)	अमरावती (AR)	३२०३.८६	१०६७.९५	१०६७.९५
९(ब)	अमरावती (ANR)	१४७.१७	४९.०५	४९.०५
१०	नागपूर	१५१६.७७	५०५.५९	५०५.५९
११	ठाणे	१६७७.९२	५५९.३१	५५९.३१
१२	TATR (Buffer)	४१.४१	१३.८०	१३.८०
१३	MTR	८६४.९२	२८८.३०	२८८.३०
	एकूण	**३४८५२.११**	**११६१७.३७**	**११६१७.३७**
